**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन



Principal

Gurukul English Medium School

Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

(२)   **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३)   **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४)   पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५)   संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.



Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय -</u>**

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |



Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वांवरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421 9-असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.
21

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

Kuldeep Masla I-G R Self Finance 13 06 2013

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ६१६ | जळगांव | समता युवक कल्याण केंद्र अमलनेर ता. अमळनेर जि. जळगाव | अमळनेर जि. जळगाव | इंग्रजी | नविनशाळा | पात्र | माध्यमिक |
| ६१७ | जळगांव | जन कल्याण आदिवासी बहूउद्देशिय संस्था पाल ता.रावेर जि.जळगांव | एन एन तडवी उर्दू हायस्कूल, पाल ता.रावेर | उर्दू | नवीनशाळा | पात्र | माध्यमिक |
| ६१८ | जळगांव | यशोदाबाई दगडु चॅरिटेबल ट्रस्ट साकेगाव ता. भुसावळ जि. जळगाव | साकेगाव ता. भुसावळ जि. जळगाव | मराठी | नवीन | पात्र | उच्च माधामिक |
| ६१९ | जळगांव | पोतदार फाऊंडेशन तळोदा जि. नंदुरबार | पाचोरा-वांग्रुड शिवार ता.पाचोरा जि. जळगाव | मराठी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२० | जळगांव | जिजाऊ बहु. संस्था अमळनेर जि. जळगाव | चोपडा रोड , शासकीय मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाशेजारी अमळनेर ता. अमळनेर जि.जळगाव | मराठी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२१ | जळगांव | जिजाऊ बहु. संस्था अमळनेर जि. जळगाव | चोपडा रोड, शासकीय मागासवर्गीय मुलांचे वसतीगृहामागे, अमळनेर ता. अमळनेर जि. जळगाव | इंग्रजी | नवीन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२२ | जळगांव | मंगलमुर्ती बहु. क्रिडा मंडळ पारोळा ता. पारोळा जि. जळगाव | पारोळा ता. पारोळा जि. जळगाव | इंग्रजी | नवीन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२३ | जळगांव | साई बहुद्येशिय संस्था एरंडोल जि. जळगाव | कासोदा ता. एरंडोल जि. जळगाव | मराठी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२४ | जळगांव | भगिनीमंडळ चोपडा ता. चोपडा जि. जळगाव | चोपडा जि. जळगाव | मराठी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ६२५ | पुणे | शिवभूमी शिक्षण मंडळ, खेड-शिवापूर, ता.हवेली | शिव भूमी इंग्लिश मिडीयम स्कूल, खेड- शिवापूर, ता.हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नविन शाळा | पात्र | पूर्व प्राथमिक |
| ६२६ | पुणे | शिव भूमी शिक्षण मंडळ, प्लॉट नं.१, से.२१, यमुनानगर, निगडी, पुणे | शिव भूमी इंग्लिश मिडीयम स्कूल, प्लॉट नं.१, से.२१, यमुनानगर, निगडी, पुणे | इंग्रजी | नविन शाळा | पात्र | पूर्व प्राथमिक |
| ६२७ | पुणे | ब्रम्हचैतन्य एज्यु.सोसा. कोरेगाव ता. शिरुर जि.पुणे. | गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल,कोरेगाव ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नविन शाळा | पात्र | पूर्व प्राथमिक |
| ६२८ | पुणे | खंडेश्वर शिक्षण संस्था, खामगांव, ता.दौंड | न्यू इंग्लिश स्कूल, खामगांव बुद्रुक, ता.दौंड, जि.पुणे | इंग्रजी | नविन शाळा | पात्र | पूर्व प्राथमिक |
| ६२९ | पुणे | संस्कृती विद्या विकास प्रतिष्ठान, कडूस, ता.खेड | डायनॅमिक इंग्लिश मिडीयम स्कूल, कडूस ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३० | पुणे | संस्कृती विद्या विकास प्रतिष्ठान, पाईट, ता.खेड | डायनॅमिक इंग्लिश मिडीयम स्कूल, पाईट ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |



VSHITP

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
विभागातंर्गत सर्व संचालक.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती माशि - १.

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.८८०/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना.-

१. ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव, ता.शिरूर, जि.पुणे संचलित गुरूकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, कोरेगाव, ता. शिरूर, जि.पुणे या शाळेस दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव, ता.शिरूर, जि.पुणे संचलित गुरूकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, कोरेगाव, ता. शिरूर, जि.पुणे या शाळेस (प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून सुरु करण्यास शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) संस्थेने प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपूर्वीच सुरू केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रू. १ लक्ष इतका दंड वसून करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्यावावतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढशाळा वावत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जवावदारी संबंधित संस्थेवर राहील.यावावतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या वाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे
७) निवडनस्ती (एसएम-२) (८८०/२०१९)

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

३२९५५/५८

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- - 6 DEC 2013

प्रति

अध्यक्ष/सचिव,

ब्रम्हचैतन्य एज्यु. सोसा. कोरगांव ता. शिरूर जि. पुणे

विषय - सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-२ दिनांक १५ जून २०१३.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता** प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ६२७ | पुणे | ब्रम्हचैतन्य एज्यु. सोसा. कोरगांव ता. शिरूर जि. पुणे | गुरूकुल इंग्लिश मिडीयम स्कुल, कोरगांव ता. शिरूर जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पुर्व प्राथमिक ✱ | २०१३-१४ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.
११. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

✱ **१२. पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणुन मंजुरी देण्यात आलेली नसुन त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजुर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरू होणा-या शाळांना १ ली पासून परवानगी देण्यात येईल.**

(सुमन शिंदे)

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.सु.न.जोशी,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Principal

Gurukul English Medium School

Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पूर्व/२०१९-२०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय (939)
दिनांक:- 14 NOV 2019

प्रति

अध्यक्ष/सचिव,

ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी, कारेगांव, ता. शिरूर, जि. पुणे

विषय - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत...

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००५/(६६३/०९)/माशि-२ दिनांक २०. जून २०१२.

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसएफएस-२०१९/प्र.क्र.८८०/एसएम-२ दिनांक १७.०९.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येत की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत [illegible] नवीन शाळा स्थापन करणेकरिता विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस [illegible] त्या शासन निर्णय नुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीस परवानगी दिलेली आहे

| शासन यादी अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी, कारेगांव, ता. शिरूर, जि. पुणे | गुरूकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, कारेगाव, ता. शिरूर, जि. पुणे | इंग्रजी | दर्जावाढ (सी.बी.एस.ई.) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ ६ वी ते १२ वी) सर्व शाखा | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१ शासन निर्णय संदर्भ क्र ३ मधील अट क्र. १ नुसार प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपूर्वीच सुरू केली नसल्याची शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यासदर शाळेकडून रू १ लक्ष इतका दंड वसूल करून त्याचा अहवाल शासनास व शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावा. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याची खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी.**

२ सदर शाळेनी बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत करण्यात व करणे जाणारे सर्व [illegible] करणे आवश्यक आहे

३ पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करून सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे

४ ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत

५ ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून [illegible] आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

६ परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७ संबंधित सक्षम अधिकारी यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी

८ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल

९ यू-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद [illegible] संबंधित यंत्रणा राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई [illegible] येत आहे. त्याचप्रमाणे शासन स्तर [illegible] माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ [illegible] आवश्यक राहील

१० परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व [illegible]

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Principal
Gurukul English Medium School
Karegaon ,Tal-Shirur , Dist - Pune